महाराष्ट्र शासन
**तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे**
४१२/ब,तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,
बहिरट पाटील चौक, शिवाजी नगर, पुणे - ४११ ०१६

दूरध्वनी क्र. (०२०) २५६५६२३४ Email ID :ropune@dtemaharashtra.gov.in

जा.क्र. तंशिविकापू/विवि-६/प्रवेश / २०२५ / 1269 दिनांकः 09 APR 2025

महत्वाचे परिपत्रक

प्रति,
पुणे विभागातील सर्व संस्था

विषय : नवीन संस्था / अभ्यासक्रम , जागा वाढ, अभ्यासक्रम बंद आणि इतर कारणासाठी नोंदणीशुल्क भरण्याची सुधारीत कार्यपद्धती

संदर्भः १) शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र.टीईम -२०१८/प्र.क्र.२३/ तांशि -४ दिनांक २२/०२/२०१८

उपरोक्त विषयास अनुसरून या विभागातील सर्व विनाअनुदानित व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या संस्थाना कळविण्यात येते कि , या विभागीय कार्यालयाकडे संदर्भिय शासन निर्णयानुसार विविध प्रस्तांवासाठी नोंदणी शुल्क भरावे लागते जसे की नवीन संस्था किंवा अभ्यासक्रम सुरु करणे , अभ्यासक्रम बंद करणे , मंजूर प्रवेश क्षमतेत वाढ करणे इत्यादी.

सद्यस्थितीत संदर्भिय शासन निर्णयात नमूद शुल्क या विभागीय कार्यालयाकडे भरण्यासाठी संस्थेच्या कर्मचाऱ्यास राष्ट्रीयकृत बँकेचा डिमांड ड्राफ्ट घेऊन यावे लागते. या प्रक्रियेत संस्थेच्या प्रतिनिधीचा नाहक वेळ व पैसा खर्च होतो. हे टाळण्यासाठी नोंदणी शुल्क भरणे सोपे होण्यासाठी पुढीलप्रमाणे सुधारीत कार्यपद्धती करण्यात येत आहे.

१) संस्थेने त्यांनी दिलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने संदर्भिय शासन निर्णयात दर्शिविलेल्या ठिकाणानुसार शुल्क किती लागेल याची खात्री करावी व सदर शुल्क ऑनलाईनरित्या या कार्यालयाच्या बँक खात्यामध्ये जमा करावी व त्या ट्रांझॅंकशनचा UTR no.व त्याचा स्क्रीनशॉट /रिसीट घ्यावी.

२) सदर रिसीट / स्क्रीनशॉट आणि UTR no.ची माहिती विभागीय कार्यालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असणाऱ्या संस्थांसाठीच्या लॉगीन मधून इतर आवश्यक माहितीसह अपलोड करावी.

३) या कार्यालयातील संबधित कर्मचारी भरलेल्या शुल्काची पडताळणी करेल व त्याची शासकीय जमा पावती ऑनलाईनरित्या अपलोड करेल जी संस्थेच्या लॉगीन मध्ये दिसेल.

४) यासंदर्भातील कोणत्याही अडचणीसाठी संबधित कर्मचाऱ्याशी संपर्क साधावा.या विभागीय कार्यालयाच्या बँक खात्याचा तपशील खालीलप्रमाणे

**JOINT DIRECTOR, TECHNICAL EDUCATION R.O.PUNE**
**ACCOUNT NO : 10198661787**
**IFSC CODE: SBIN0007339**
**Branch: University Road , Shivajinagar, Pune**

( डॉ.द.व्यं.जाधव )
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे